**RNI No. MAHBIL/2009/37831**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

**वर्ष ८, अंक ८४(१२)]** **गुरुवार, जून २३, २०२२/आषाढ २, शके १९४४** **[पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००**

**असाधारण क्रमांक २३१**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ जून २०२२

### अधिसूचना

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक एमआयएस. ०९२०/प्र.क्र.१५४/राउशु-२.—ज्याअर्थी, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये आणखी सुधारणा करून पुढील नियम तात्काळ अंमलात आणले जावेत आणि म्हणून, हे नियम, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५) चे कलम १४३ चे पोट-कलम (३) मधील परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिद्धीशिवाय तयार करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम १४३ चे पोट-कलम (२) च्या खंड (बी) आणि (एफ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, मुंबई विदेशी मद्य (चौथी सुधारणा) नियम, २०२२ असे संबोधण्यात यावे.

२. मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ च्या नियम ३ मधील खंड (६) मध्ये,—

(i) उप खंड (१) मधील नोंद (४) नंतर खालील नोंद समाविष्ट करण्यात यावी, जसे की :-

(५) स्थानिक मद्य

(ii) उप खंड (२) मधील परिच्छेद (ड) नंतर खालील परिच्छेद समाविष्ट करण्यात यावा, जसे की :—

"(इ) "स्थानिक मद्य" याचा अर्थ, काजूबोंडे, मोहाफुले किंवा राज्यात स्थानिकरित्या उत्पादित होणाऱ्या इतर किण्वन होणाऱ्या फळे/फुले यापासून तयार होणाऱ्या मद्यार्कापासून उत्पादित केलेले आणि ज्याची मद्यार्क तीव्रता २५ यु.पी. इतकी आहे असे कोणतेही विदेशी मद्य."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 23rd June 2022.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. MIS. 0920/C.R.154/EXC-2.— Whereas, the Government of Maharashtra is considers that the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953 should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949);

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*b*) and (*f*) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, as follows namely :–

1. These rules may be called the Bombay Foreign Liquor (Fourth Amendment) Rules, 2022.
2. In rule 3 of the Bombay Foreign Liquor Rules, 1953, in clause (6),–

(*i*) in sub-clause (1), after entry (iv), the following shall be added, namely :–
(v) local liquor

(*ii*) in Sub-clause (2), after para (d), the following shall be added, namely :–

"(e) "local liquor" means any foreign liquor Manufactured by using spirit produced from cashew apples, mohwra flowers or any other fermentative bases of fruits or flowers which are produced locally in state and having alcoholic strength 25° U.P."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.